# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन एच/पश्चिम विभाग.)

क्र. स.अ/घ.क.व्य/एच-प/१५६६/ दि.१६.१०.२०२५

## स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात.

एच/पश्चिम विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, मोटर लोडर योजने अंतर्गत एच/पश्चिम विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, इ. संस्थाकडुन त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

अर्जाचा नमुना एच/पश्चिम विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) यांच्या कार्यालयात रु.३६३०/- अधिक १८% GST इतके छाननी शुल्क रोख स्वरुपात (ना परतावा) दि.१८.१०.२०२५ ते दि.२८.१०.२०२५ (सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टीचे दिवस वगळता) पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी ०२.०० यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी एच/पश्चिम विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने एच/पश्चिम विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.२८.१०.२०२५ (दुपारी ०४.०० वाजेपर्यंत) नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

कार्यकारी अभियंता (घकव्य) परि – ३(प्र.)